# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्रमांक- प्रअ/विनि/ २०५४९/साधारण दि.१०.०२.२०२१

प्रअ/विनि/१५३ /साधारण

२०२१-२२

विषयः बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींनुसार विविध विकास कामांसाठी परवानगी देण्याकरिता आणि विकास हक्क प्रमाणपत्र देण्याकरिता व त्याची पुनर्विधीग्राहृता करण्याकरिता छाननी शुल्काची पुनर्रचना करण्याबाबत.

महानगरपालिकेने ठराव क्रमांक ९२३ दि.२३.११.२०१७ नुसार सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ मध्ये दिलेल्या पुनर्रचित शुल्काची अनुसूची सन २०१७-१८ करिता महानगरपालिकेची मंजुरी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सुधारित दरानुसार शुल्क आकारण्यास, तसेच सन २०१७-१८ नंतर येणा-या पुढील प्रत्येक आर्थिक वर्षात १ एप्रिलपासून पुढील नविन धोरण निश्चित होईपर्यंत विद्यमान किमान छाननी शुल्कामध्ये १० % इतकी वाढ करुन येणारी रक्कम (सुधारित शुल्कदर) पुढील दहा रुपयांच्या पूर्णांकात लागू करण्याबाबत व प्रती चौ.मीटर छाननी तसेच प्रपत्र शुल्कदरात १० % इतकी वाढ करुन येणारी रक्कम अपूर्णांकात असल्यास पुढील रुपयांच्या पूर्णांकात लागू करण्याबाबत मंजुरी प्राप्त झाली आहे.

त्यानुसार महानगरपालिकेच्या मंजुरी दिनांकापासून म्हणजेच दि.२३.११.२०१७ पासून सुधारित दर लागू करण्याबाबतचे परिपत्रक क्र.प्रअभि/विनि/२४५७०/साधारण दि.१५.१२.२०१७ नुसार निर्गमित करण्यात आले आहे. तसेच, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता दि.०१.०४.२०१८ पासूनच्या सुधारित दराबाबत परिपत्रक क्र.प्रअ/विनि/३६९५०/साधारण दि.३१.०३.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे. व दि. ०१.०४.२०१९ पासूनच्या सुधारित दराबाबत परिपत्रक क्र. प्रअ/विनि/३५१२५/साधारण दि.२२.०३.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे. व दि. ०१.०४.२०२० पासूनच्या सुधारित दराबाबत परिपत्रक क्र. प्रअ/विनि/३२२८०/साधारण दि.१७.०३.२०२० अन्वये निर्गमित करण्यात आले आहे.

आता, सन २०२१-२२ करिता दि.०१.०४.२०२१ पासून सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ मध्ये नमूद केल्यानुसार सुधारित दर लागू करण्यात आले आहेत.

| | | |
|---|---|---|
| सही/- २९.०१.२०२१<br>कार्यकारी अभियंता<br>(विकास नियोजन) शहर | सही/- ०२.०२.२०२१<br>उप प्रमुख अभियंता<br>(विकास नियोजन)-१ | सही/- ०२.०२.२०२१<br>प्रमुख अभियंता (वि.नि)/<br>संचालक (अ.से.व प्र ) |

F:\HC GEN - 1(ss)\Forwarding for Cir. 2020-21\Forwarding (□□□□□ .doc

## बृहन्मुंबई महानगरपालिका

### परिशिष्ट - १

### छाननी शुल्कांची अनुसूची

1. प्रस्तावित आणि विद्यमान छाननी शुल्कांच्या श्रेणीचा तपशील.

| अ.क्र. | बाब | दि. ०१.०४.२०२० पासून लागू केलेले दर | सन २०२१-२२ या वर्षाकरिता दि.०१.०४.२०२१ पासून लागू करण्यात आलेले दर (महानगरपालिका ठराव क्र.९२३ दि.२३.११.२०१७) |
|---|---|---|---|
| १. | सर्व आरक्षणांच्या बाबतीत विकास हक्क प्रमाणपत्र देणे. | किमान रु. ८३३०/-सापेक्ष टीडीआर क्षेत्राच्या प्रति चौ.मी.ला रु. ६५/- | किमान रु.९१७०/-सापेक्ष टीडीआर क्षेत्राच्या प्रति चौ.मी.ला रु.७२/- |
| २. | संस्कृती वारसाच्या सर्व बांधकामांकरिता विकास हक्क प्रमाणपत्र देणे. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे |
| ३. | विकास नियंत्रण नियमावली ९१ नियम क्र.९ तक्ता क्र.४ अन्वये समायोजन आरक्षणांच्या बाबतीत (अकमोडेशन रिझर्वेशन) विकासाची परवानगी देणे. | किमान रु. ७५१०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी.ला रु. १९/- | किमान रु. ८२७०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी. ला रु. २१/- |
| ४. | विकास नियंत्रण नियमावली १९९१ च्या नियम क्र. ५६, ५७, ५८ व १३ मधील तरतूदींनुसार औद्योगिक पट्ट्यातील जमिनींवर निवासी / व्यावसायिक विकासास परवानगी देण्याचा प्रस्ताव. | नियमावली क्र. ५६, ५७, व १३ मधील तरतुदींनुसार औद्योगिक पटटयातील जमिनींवर निवासी /व्यावसायिक विकासास परवानगी देण्याकरिता किमान रु. ७५१०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी. ला रु.१९/- आणि विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या नियम क्र.५८ मधील तरतुदींनुसार सुती कापड गिरण्यांच्या पुर्नविकासास परवानगी देण्याकरिता किमान रु. १६,२४०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी. ला रु. ४०/- | नियमावली क्र. ५६, ५७, व १३ मधील तरतुदींनुसार औद्योगिक पटटयातील जमिनींवर निवासी /व्यावसायिक विकासास परवानगी देण्याकरिता किमान रु.८२७०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी. ला रु.२१/- आणि विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या नियम क्र.५८ मधील तरतुदींनुसार सुती कापड गिरण्यांच्या पुर्नविकासास परवानगी देण्याकरिता किमान रु.१७,८७०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी. ला रु.४४/- |
| ५. | शैक्षणिक आणि वैद्यकीय सुविधांकरिता आरक्षित असलेल्या जमिनीच्या विकासास परवानगी देण्याचा प्रस्ताव. | किमान रु. ५०१०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति १० चौ.मी. ला रु. ३२/- | किमान रु.५५२०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति १० चौ.मी. ला रु.३६/- |
| ६. | झोपडपटटी पुनर्वसन प्रकल्पांच्या बाबतीत विकास हक्क प्रमाणपत्र देणे. | किमान रु. ७५१०/- सापेक्ष टी.डी.आर. क्षेत्राच्या प्रति चौ.मी. ला रु. ३२/- | किमान रु.८२७०/- सापेक्ष टी.डी.आर. क्षेत्राच्या प्रति चौ.मी. ला रु.३६/- |
| ७. | विकास नियंत्रण नियमावली १९९१ नियम११(४) मधील तरतूदींनुसार विकास नियोजन आरक्षण/सुविधेकरिता (आरक्षित)भूखंडांचे पुनर्स्थापन करण्याकरिता परवानगी देणे. | प्रति प्रस्तावाकरिता रु. १२,५००/- इतका ठोक आकार. | प्रति प्रस्तावाकरिता रु.१३,७५०/- इतका ठोक आकार. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | विकास नियंत्रण नियमावली क्र.६७ अन्वये विकासाकरिता परवानगी देण्याकरिता म्हणजे संस्कृती वारसा समितीकडून निर्वाळा मिळण्याच्या प्रस्तावाकरिता छाननी शुल्क | प्रति प्रस्तावाकरिता रु. ५०१०/- इतकी ठोक रक्कम | प्रति प्रस्तावाकरिता रु.५५२०/- इतकी ठोक रक्कम |

(ब) <u>वरील (अ) १ ते ६ करिता पुनर्विधीग्राह्यता शुल्क</u>

१) (अ) १, २ व ६ प्रकरणी जारी केलेली विकास हक्क प्रमाणपत्रे ५ वर्षाकरिता विधीग्राह्य राहतील आणि त्यानंतर पुढील ५ वर्षाकरिता तत्कालिन छाननी शुल्काच्या १.० टक्के दराने पुनर्विधीग्राह्य शुल्क वसूल करुन पुनर्विधीग्राह्य केली जातील. अनुक्रमे १ , २ व ६ प्रकरणी तत्कालिन किमान शुल्क हे प्रत्येक वर्षी तत्कालिन किमान शुल्कात १० टक्के वाढ करुन येणा-या रक्कमेएवढे असेल.

२) बाब क्र. (अ) ३, ४ व ५ अन्वये दिलेल्या विकासाच्या परवानगीसंबंधी येथे नमूद करण्यात येते की, सदर परवानगी २ वर्षांच्या कालावधीकरिता विधीग्राहय राहील आणि त्यानंतर २ वर्षांकरिता तत्कालिन छाननी शुल्काच्या १० टक्के दराने पुनर्विधीग्राहय शुल्क वसूल करुन पुनर्विधीग्राहय करता येईल. तसेच तत्कालिन किमान शुल्कात दरवर्षी १० टक्के दराने वाढ होईल.

(क) <u>विकास हक्क प्रमाणपत्राच्या वापराकरिता छाननी शुल्क</u>

(अ) १,२ व ६ करिता किमान रु.९१७०/- सापेक्ष टी.डी.आर. क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी.ला रु.७२/- या दराने वापर शुल्क आकारले जाईल.

(ड) <u>विकास हक्क प्रमाणपत्राचे हस्तांतरण</u>.

विकास हक्क प्रमाणपत्राच्या हस्तांतरणाकरिता वरील (अ) १, २ करिता किमान रु.९१७० /-सापेक्ष टी.डी.आर. भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी.ला रु.७२/- या दराने छाननी शुल्क आकारले जाईल व वरील (अ) ६ प्रमाणे किमान रु.८१७०/- सापेक्ष टी.डी.आर. भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मीटरला रु.३६/- या दराने हस्तांतरण शुल्क आकारले जाईल.

विकास हक्क प्रमाणपत्राचे हस्तांतरण कायदेशीर वारसाला करण्याकरिता प्रत्येक हस्तांतरणाला रु.५५२०/- या ठोक रकमेने (दराने) छाननी शुल्क आकारले जाईल.

(इ) <u>विकास हक्क प्रमाणपत्र , अर्ज प्रपत्र, हस्तांतरण प्रपत्र, वापर प्रपत्र.</u>

विकास हक्क प्रमाणपत्राच्या अर्ज प्रपत्राकरिता रु.२९३/- अधिक मूल्यवर्धीत कर (Vat) आकारले जाईल. हस्तांतरण प्रपत्र/वापर प्रपत्र याकरिता रु.६०/- अधिक मूल्यवर्धित कर (Vat) त्याचप्रमाणे वेळोवेळी शासनाकडून लागू करण्यात येणारे याप्रकारचे कर आकारण्यात येतील. सदर आकारणी वसूल करणे सोईचे व्हावे यादृष्टीने शुल्क वाढ प्रस्ताविली आहे.

| | | |
|---|---|---|
| सही/- २९.०१.२०२१<br>कार्यकारी अभियंता<br>विकास नियोजन(शहर) | सही/- ०२.०२.२०२१<br>उपप्रमुख अभियंता<br>(विकास नियोजन)-१ | सही/- ०२.०२.२०२१<br>प्रमुख अभियंता (वि.नि)/<br>संचालक (अ.से.व प्र ) |